निरीक्षक (गट-ब), राउशु, या पदावरील पदोन्नतीच्या पदस्थापनेमध्ये अंशत: बदल करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन आदेश क्रमांक- इएसटी-१७१७/प्र.क्र.१२१/राउशु-१
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- २१ सप्टेंबर, २०१९.

वाचा :- शासनाचे समक्रमांकित दि.११.०९.२०१९ चे आदेश.

आदेश :

राज्य उत्पादन शुल्क विभागातील निरीक्षक (गट-ब) संवर्गामध्ये संदर्भाधीन आदेशान्वये पदोन्नतीने पदस्थापना दिलेल्या खालील अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेमध्ये अंशत: बदल करून त्यांची सुधारित पदस्थापना स्तंभ ४ मध्ये दर्शविलेल्या पदावर करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	पद	नवीन पदस्थापना
१	२	३	४
१.	श्री. पंकज भाउ कुंभार	भरारी पथक, नांदेड	मे. पायोनियर डिस्टिलरीज, नांदेड
२.	श्री. श्रीकांत पाडळे	सीमा तपासणी नाका, करंजाळी.	मे. संगमनेर स.सा.का., संगमनेर
३.	श्री. यु.पी. बर्डे	भरारी पथक, धुळे	श्रीरामपूर, जि. अहमदनगर.
४.	श्री.दत्तात्रय शंकर चव्हाण	मे.देशभक्त रत्नाप्पा कुंभार स.सा.का., कोल्हापूर	मिरज, जि. सांगली.

२. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५, मधील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्वमान्यतेने सदर आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

३. हे आदेश तात्काळ अंमलात येतील. सदर अधिकाऱ्यांना या आदेशाच्या दिनांकापासून कार्यमुक्त करण्यात यावे. सदर अधिकाऱ्यांनी त्यांना देण्यात आलेल्या पदोन्नतीच्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर होउन पदाचा कार्यभार घ्यावा. उक्त अधिकारी यांनी बदलीच्या ठिकाणी विहीत कालावधीमध्ये रूजू झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेविरूद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

४. बदलीच्या आदेशात बदल करून घेण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्याने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे ती गैरवर्तणूक समजून संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

५. सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०९२११०३७२७७१२९ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

P H WAGDE

Digitally signed by P H WAGDE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=26d7295f0f289d96eecb9e12c2850ebd4f894edc0ea69760a3c1561515a6bf87,
postalCode=400032,
street=MANTRALAYA ,MUMBAI, ou=NA,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=P H WAGDE
Date: 2019.09.21 12:35:46 +05'30'

(पु. हि. वागदे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति:

१. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
३. सर्व विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
४. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
५. संबंधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
६. कार्यासन अधिकारी, राउशु-२ व राउशु-३, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
७. संबंधित अधिकारी.
८. निवडनस्ती (राउशु-१)

****